# सांगोला-मिरज रोडवरील रेल्वे भुयारी मार्गाखाली खड्डे आणि पाणी

सांगोला/प्रतिनिधी

बहुचर्चित सांगोला मिरज रोडवरील रेल्वे भुयारी मार्गाखाली पाण्याची गळती आणि खड्डे मोजण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले. परंतु या प्रयत्नाला आज ही अपयश आहे. सांगोल्यात रिमझिम पाऊस सुरू असला तरी पाण्याची गळती भुयारी मार्गातून सुरू असल्याने व भुयारी मार्गामध्ये रस्त्याच्या मध्यभागी खड्डे पडल्यामुळे या खड्ड्यातून वाट काढत प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सांगोला -मिरज रोडवरील रेल्वे खालील भुयारी मार्ग पाण्याच्या गळती काढण्यासाठी अनेकदा बंद ठेवण्यात आला आहे. यामध्ये विशेष कर्मचारी यांच्यामार्फत पाण्याचे गळती ही काढण्याचां प्रयत्न केला आहे. परंतु आज अखेर केलेले सर्व प्रयत्न अपयशी ठरले आहेत. कारण पाण्याची गळती थांबता थांबेना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामध्ये दुष्काळात तेरावा महिना म्हणून भुयारी मार्ग खाली रस्त्याच्या मध्यभागी खड्डे पडल्यामुळे भुयारी मार्गात कायमस्वरूपी पाणीसाचून राहत आहे. खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अनेकदा छोट - मोठे अपघात घडत आहेत. तर पाण्यातून मार्ग काढताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

> सांगोला मिरज रोडवरील रेल्वे गेट क्रमांक ३२ खालून जाणारा भुयारी मार्ग सुरुवातीपासूनच वादग्रस्त आणी चर्चेत
>
> बहुचर्चित सांगोला मिरज रोडवरील रेल्वे भुयारी मार्गाखाली पाण्याची गळती आणि खड्डे
>
> सांगोला मिरज रोडवरील रेल्वे गेट क्रमांक ३२ वर खड्डे पडल्याने अपघातास निमंत्रण

सांगोला मिरज रोडवरील रेल्वे गेट क्रमांक ३२ खालून जाणारा भुयारी मार्ग सुरुवातीपासूनच वादग्रस्त आणी चर्चेत राहिला आहे. भुयारी मार्ग खाली पाणी साचून राहते तर आज ही भुयारी मार्गांमधून पाण्याचे झरे वाहत आहेत. या भुयारी मार्गांमधून एसटी देखील सरळ जात नाही. दुचाकी आणि चार चाकी वाहन धारकांना मोठी कसरत करावी लागते. याबाबत राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच विविध संघटना नागरिकांनी याबाबत रेल्वे प्रशासनाकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या. यापूर्वीही केवळ दुरुस्तीच्या नावाखाली भुयारी मार्ग बंद ठेवण्यात आला. परंतु गळती काढण्यामध्ये प्रशासनाला यश आले नाही. यामध्ये वाहनधारकांना आपला मार्ग बदलावा लागला. तर काहींनी आपला उद्योग व्यवसाय बंद केला ही परिस्थिती आज ही विधारक आहे. अधिकच पाणी आणि खड्डे यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, रेल्वे प्रशासनाने यावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी मागणी वाहनधारकांमधून केली जात आहे.



सांगोला : सांगोला मिरज रोडवरील रेल्वे भुयारी मार्गाखाली पाण्याची गळती आणि खड्डे पडल्याने नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

## पंढरपूर शहराला आजपासून रोज पाणी

पंढरपूर : गेल्या कित्येक महिन्यापासून पंढरपूर शहराला एक दिवस आड पाणीपुरवठा हा सुरू होता. उजनी धरणामध्ये पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे एक दिवस आड पाणीपुरवठा पंढरपूर शहराला होत होता. परंतु उजनी धरणामध्ये पाण्याची क्षमता हळूहळू वाढू लागल्यामुळे आणि त्याचप्रमाणे सालाबाद प्रमाणे आषाढी यात्रा पंढरपूर



शहरामध्ये भरत असल्यामुळे लाखोच्या संख्येने भाविक भक्त येत असतात. या भावीक भक्तांची व स्थानिक नागरिकांची पाण्या वाचून अडचण होऊ नये. म्हणून पंढरपूर नगरपालिका मुख्याधिकारी यांनी पंढरपूर शहराला दिनांक १० जुलै २०२४ पासून पंढरपूर शहराला नियमितपणे दररोज पाणीपुरवठा हा केला जाणार आहे. असे त्यांनी आज रोजी सांगितले.पंढरपूर शहरातील नागरिकांनी व भावीक भक्तांनी पाण्याचा योग्य तो वापर करावा. व पाणी जपून वापरावे. असे आवाहन त्यांनी पंढरपूर रहिवासी व भावीक भक्तांना केले आहे.

# झेडपीकडून वारीची जय्यत तयारी

## जिल्हाधिकारी आशीर्वाद अन् सीईओ आव्हाळे यांचा संयुक्त पाहणी दौरा

सोलापूर/प्रतिनिधी

आषाढी यात्रा यशस्वी करणे साठी जिल्हा परिषदेने युध्दपातळींवर प्रयत्न सुरू असून यंत्रणेची जय्यत तयारी सुरू आहे . आज सिईओ मनिषा आव्हाळे यांनी पालखी तळांची पाहणी करून वारकरी बांधवाच्या

सेवे साठी सज्ज राहणेचे सुचना दिल्या. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन सजग रहा असे सांगत चांगले काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे पाठीवर शबासकीची थाप दिली. दरम्यान आज जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व सिईओ मनिषा आव्हाळे यांनी हिरकणी कक्ष व वारकरी यांचे साठी उभा करणेत आलेल्या आरोग्य केंद्रास संयुक्तीक भेटी देऊन पाहणी केली.

आज सकाळी ८ वाजता गोपाळपूर, वाखरी, भंडीशेगाव, पिराची कुरोली, वेळापूर, पुरंदावडे,



पंढरपूर : आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर हिरकणी कक्षाची उभारणी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद व सीईओ आव्हाळे आदी.

धर्मपुरी, अकलूज (संग्रामनगर) सराटी फाटा यासह बोरगाव, माळीनगर व तोंडले येथील पालखी तळ मुक्कामाची स्थिती जाणून घेतली. सध्या पालखी तळ, मंडप, तात्पुरते शौचालय स्थळ, स्नानगृह, पालखी, गोल/उभे रिंगण स्थळ, पालखी कट्टा सुशोभीकरण, पालखी मार्ग रस्ते, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, हिरकणी कक्ष, पाणीपुरवठा विहीर व शुद्धीकरण, स्वागत कमान, रोषणाई, टॅंकर पाणी भरणा केंद्र, तात्पुरते आरोग्य केंद्र, प्लास्टिक/ कचरा संकलन केंद्राची पाहणी सिईओ मनिषा आव्हाळे यांनी विभाग प्रमुखासह केली.

## मराठा आरक्षण शांतता रॅली; परंड्यात बैठकीस प्रतिसाद

परंडा : मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.१० जुलै रोजी धाराशिव शहरात मराठा समाज शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीसाठी परंडा तालुक्यातील हजारो मराठा बांधव जाणार असून यासाठी गावा गावात जनजागृती करण्यात येणार




आहे. जनजागृतीसाठी शहरांसह गावोगावी सकल मराठा समाजाच्या बैठका, रॅली काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील सर्व वाहनांचा ताफा रॅली दिवशी सकाळी ८ वाजता वारदवाडी फाटा येथे एकत्र येणार असून तेथून धाराशिवकडे मार्गस्थ होणार आहे. या बैठकीस माजी आमदार राहूल मोटे, जि.प. माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जि.प.माजी सदस्य नवनाथ जगताप, शिवसेना (ठाकरे) जिल्हाप्रमुख रणजित पाटील यांच्यासह सर्व पक्षीय पदाधिकारी, सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

# दरोड्याच्या तयारीतील टोळी जेरबंद; ९ जणांवर गुन्हा

सोलापूर/प्रतिनिधी

दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना टिकेकर वाडी रेल्वे ब्रिजच्या पुलाखाली विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या पथकाने ९ जणांना अटक करून दरोड्यासाठी लागणारे सर्व साहित्य जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.ही घटना १० जुलै रोजी पहाटे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास टिकेकर वाडी रेल्वे ब्रिजच्या बोगद्याच्या खाली कुमठे गाव रोड येथे घडली.कुंभारी येथील अश्विनी हॉस्पिटल येथे दरोडा टाकण्याच्या तयारीने हि नऊ जणांची टोळी निगाली असताना वाटेतच त्यांच्या मुसक्या आवळल्या.

> सर्वजण विजापूर जिल्ह्यातील

कणकुर्ती ज्ञानदेव गोंधळी (वय-२२,रा. गांधीनगर,स्टार चौक विजयपूर),संजय मल्लप्पा पुजारी (रा.मु.पो.चिक्करूगी,जि.विजयपूर),समीर मुक्तुमसाब कोलार (वय-२०,रा.मु.पो. चिक्करूगी,जि.विजयपुर),अभिषेक देवानंद बिरादर (वय-१९,रा.मु.पो.मु.पो.चिक्करूगी,जि. विजयपुर),लिंगय्या हिरय्या हिरेमठ,(वय-२३,रा.मु.पो.चिक्करूगी,जि.विजयपुर),प्रविण मोनाप्पा बडीगेर,(वय-१९,रा.मु.पो.चिक्करूगी,जि. विजयपुर), आकाश बसवराज भासगी (वय-१९, रा.सुरगीहळळी,ता.सिंदगी,जि. विजयपुर), रमेश महादेवप्पा सालोडगी (वय-१९,रा.दवरहिप्परगी, जि.विजयपुर)हबीब पठाण (रा.कुंभारी) हे सर्व आरोपी अश्विनी हॉस्पिटलवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना पेट्रोलिंगवर असलेले पोलीस शिपाई अमृत गुंडप्पा सुरवसे (वय-३३,नेमणूक विजापूर नाका पोलीस ठाणे सोलापूर शहर) यांनी पहाटेच्या सुमारास या सर्वांना अटक केली.व त्यांच्या ताब्यातून एक लोखंडी कटर,लाल रंगाची घरगुती गॅस टाकी,रेगुलेटर,गॅस कटर, लोखंडी कटावणी,लोखंडी पाना,चार नवीन काळया रंगाचे टी-शर्ट, तोंडाचे काळे मास्क,स्कार्फ, निळया रंगाचा सॅक, प्लॅस्टिकचे दोन धान्याचे रिकामी पोते असे साहित्य जप्त केले.विजापूर नाका पोलीस ठाण्यात ९ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करत आहेत.




सोलापूर : दरोड्यातील संशयित आरोपी व विजापूर नाका पोलिसांचे पथक.

### जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन

## माकपच्या पदाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

सोलापूर : निदर्शने आंदोलनास परवानगी नाकारण्यात आलेली असताना देखील नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्रित येऊन घोषणाबाजी करत जमाबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी माकपच्या ७ पदाधिकाऱ्यांवर पुन्हा दाखल झाला आहे.या घटनेच्या हकीकत अशी की,भारतीय ट्रेड युनियन सोलापूर (माकप) च्या पदाधिकारी व सदस्यांनी नवीन जिल्हाधिकारी कार्यालय येथे निदर्शने आंदोलन करण्यास परवानगी नसताना सुद्धा घोषणाबाजी केली.तसेच पुनम गेट येथे निदर्शने घोषणाबाजी करू नका असे आवाहन करून देखील मोठमोठ्याने घोषणाबाजी करत नवीन नियोजन भवन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रस्त्याने चालत जाऊन निदर्शने केली.याप्रकरणी विक्रम छगन कलबुर्गी,अनिल अंबादास वासम,विजय हरसुरे,सनि अंबादास कोंडा,किशोर बजरंग झेंडेकर,अखिल अहमद इस्माईल शेख,अशोक सिद्राम बल्ला (रा.सर्वजण दत्तनगर सोलापूर) यांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

### रेवणसिद्धेश्वर नगरातील घटना

सोलापूर/प्रतिनिधी

विजापूर नाका परिसरातील रेवणसिद्धेश्वर नगरात राहणाऱ्या एका ४० वर्षीय विवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली .

प्रवीण माणिक नवगिरे (वय ४० रा.रेवणसिद्धेश्वर नगर) असे मयताचे नाव आहे. त्याचा मृतदेह आज सकाळी ८ वाजेच्या सुमारात घरातील छताच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत प्रवीण नवगिरे हा ड्रायव्हर म्हणून काम करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी, तीन मुले आणि आई असा परिवार आहे. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : कुंभारी घरकुल (ता.दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या लक्ष्मीनारायण सिद्राम जिंदम (वय ६० ) याने राहत्या घरात अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना काल मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी अमर (मुलगा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### करमाळा रोडवर अपघात; दुचाकी वरील दोघे जखमी

सोलापूर :जातेगाव ते करमाळा असा दुचाकीवरून प्रवास करताना कामुनी फाट्याजवळ पाठीमागून आयशर टेम्पो धडकल्याने अर्जुन उत्तम मोरे (वय ४५ ) आणि बाबा दशरथ माने (वय ६५ दोघे रा.जातेगाव ता. करमाळा) हे दोघे जखमी झाले. हा अपघात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडला. ते दोघे दुचाकी वरून करमाळ्याच्या दिशेने निघाले होते. आयशर टेम्पो धडकल्याने दोघे जखमी झाले. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून अजित माने (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

# संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे करमाळ्यात स्वागत

- जवळपास ४० हजारांच्या संख्येने येणाऱ्या या पालखीच्या वारकऱ्यांनी सुभाष चौकाच्या चारही रस्त्यांना दूरपर्यंत पंगत धरली.
- पालखीचे करमाळा शहरात सकाळी दहा वाजता नागोबा मंदिरासमोर आगमन
- श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून करमाळा मार्गे पंढरपूरला जाणाऱ्या संत श्री निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे मंगळवारी रावगाव येथे प्रशासनाच्या वतीने स्वागत
- छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्या वतीने वारकऱ्यांना नाष्ट्याची आणि चहा पाण्याची सोय
- पालखी सोबत आलेल्या वारकऱ्यांना वैधकीय सेवा
- ५० फिल्डर पाण्याची सोय

करमाळा/प्रतिनिधी

अवघा रंग एक झाला ।
रंगि रंगला श्रीरंग ।।

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला येणाऱ्या मानाच्या पालख्यांपैकी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून करमाळा मार्गे पंढरपूरला जाणाऱ्या संत श्री निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे मंगळवारी रावगाव येथे प्रशासनाच्या वतीने प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर, तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्यासह पोलिस निरीक्षक विनोद घुगे, गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी स्वागत केले. मंगळवारच्या राव गाव येथील मुक्कामानंतर बुधवारी सकाळी या पालखीचे करमाळा शहरात सकाळी दहा वाजता नागोबा मंदिरासमोर आगमन झाले. शहरातील राशीन पेठ तरुण मंडळाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी या पालखीचे स्वागत करत मंडळाच्या तरुणांनी पालखी खांद्यावर घेऊन पालखीची टाळ मृदुंगाच्या गजरासह वाजत गाजत मिरवणूक काढली.

बरोबर अकरा वाजता सुभाष चौकात आकर्षक सजावट केलेल्या मंडपात ही पालखी विसावली. यानंतर शहरातील आबालवृद्धांनी संत श्री निवृत्ती महाराजांच्या पालखीचे रांग लावून दर्शन घेतले. दरम्यान जवळपास ४० हजारांच्या संख्येने येणाऱ्या या पालखीच्या वारकऱ्यांनी सुभाष चौकाच्या चारही रस्त्यांना दूरपर्यंत पंगत धरली. राशिन पेठ सह दत्त पेठ, गजराज तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि व्यापारी वर्गाने सर्व वारकऱ्यांना अगत्याने जेवण वाढले. विठ्ठल नामात रंगलेल्या या सोहळ्याला तहसीलदार शिल्पा ठोकडे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर आदींनीही भक्ति भावाने दर्शन घेत पाहणी केली. केवळ अर्ध्या तासात शिस्तीने पंगतीला बसलेल्या या वारकऱ्यांना तेवढ्या शिस्तीने सर्वांनी महाप्रसाद वाढला. करमाळकरांच्या पाहुणचाराला तृप्तीची ढेकर देत वारकऱ्यांनी पुढचा रस्ता धरला. जेवणानंतर रस्त्याची तातडीने स्वच्छता करून वाशिम पेठ तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपजिल्हा रुग्णालयासमोरील दत्त मंदिरापर्यंत खांद्यावरून पालखी नेऊन जड अंतकरणाने पालखीला निरोप दिला.

पालखीच्या आगमनाच्या निमित्ताने करमाळा शिवसेना युवासेना महिला आघाडीच्या वतीने पालखीतील वारकऱ्यांना औषधोपचार देण्यात आले. करमाळा तालुका मेडिकल असोसिएशन आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष यांच्या वतीने जवळपास तीन हजार रुग्णांना सर्दी ताप खोकला गुडघेदुखी आदी औषधे देण्यात आली. यासोबतच वारकऱ्यांसाठी शिवसेना वैद्यकीय कक्षा समोर जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या वतीने, कर्जत चौकात भाजपा तालुकाध्यक्ष रामभाऊ ढाणे यांच्या वतीने तर सावंत गल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्या वतीने नाष्ट्याची आणि चहा पाण्याची सोय करण्यात आली होती. तसेच टागरग्रुप आणि चालक-मालक संघटनेतर्फे उपवासाचे पदार्थाचे वाटप करण्यात आले.






करमाळा : राशीन पेठ तरुण सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पालखीची टाळ मृदुंगाच्या गजरासह खांद्यावरुन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात तहसीलदार शिल्पा ठोकळे, पोलिस निरिक्षक विनोद घुगेयांच्यासह आदींनी संत निवृती महाराज पालखीचे भक्ती भावाने दर्शन घेतले.

### फिनोलेक्सतर्फे वीस हजार पिशव्यांचे वाटप

शहरातील शिवशक्ती इरिगेटर्सचे सरडे यांच्या हस्ते फिनोलेक्स कंपनीच्या वतीने वारकऱ्यांना वीस हजार पिशव्यांचे आणि राजगिरा लाडूंचे वाटप करण्यात आले. तर संगम चौक येथील अजिंक्य इलेक्ट्रॉनिक्सच्या वतीने वारकऱ्यांसाठी ५० फिल्टर पाण्याचे जार ठेवण्यात आले होते.

जाहीर नोटीस

निशाण नं.९
दि.कि.अर्ज नं.२१४/२०२४

सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात
(श्री.व्ही.पी.कुंभार सो १३ वे दि.न्या. व. स्तर सोलापूर)

१) राघवेंद्र पिता नाराण मंगरूळकर
वय-५९ वर्षे, धंदा - शेती,
रा.२-अ न्यु संतोष नगर, विजापूर रोड,
सोलापूर - ०४. मो.नं.९४२१९५५१९६
२) विकास पिता नारायण मंगरूळकर
वय-५४ वर्षे, धंदा - नोकरी,
रा.सदर, मो.नं.९४०४३०७०४२
३) सौ.अनिता पती अनिल गोसावी
वय-६३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा.२४३ जानकी नगर, विजापूर रोड,
सोलापूर - ०४. मो.नं.९४२१९५५१९८
- अर्जदार

विरूद्ध
कोणी नाही - सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ चे वडील नारायण दत्तात्रय मंगरूळकर दिनांक ०९/०१/२०२२ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार नं.१ ते ३ ची आई दि.२१/०२/२०१९ रोजी सोलापूर येथे मयत झाली आहे. त्यानंतर यातील अर्जदार नं.१ यांनी दोन्ही क्लेमची एकूण रक्कम रू.१,६७,०५८/- करिता मागणी केली असता, असि. डिव्हीजनल फायनान्स मॅनेजर, सेंट्रल रेल्वे सोलापूर यांनी दि. ६/४/२०२२ रोजी रक्कम रु. ४०,५९३/- त्यानंतर दि.२३/१२/२०२३ रोजी रक्कम रूपये १,२६,४६५/- ही रक्कम मिळणेकरीता पत्र दिले त्यांनी मा. दिवाणी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेवून येण्यास सांगितले. अर्जदार नं.१ ते ३ व्यतिरिक्त मयतास अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत. याकरिता वारसा दाखल मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी जर कोणास अर्जदार नं.१ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून ३० दिवसांचे आंत किंवा नेमलेली ता.९/८/२०२४ रोजी मे.कोर्टात हजर रहावे, तसे न झाल्यास अर्जदार नं.१ ते ३ यांच्या नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. तदनंतर कोणाचीही हरकत व तक्रार चालणार नाही. ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे. ही जाहिर नोटीस दिली ता.६/७/२०२४.

सही/- लिपिक
शिक्का
सही/-
सहा.अधीक्षक
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
सोलापूर